डॉ. मोहन नामदेव आमृळे
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
ईमेल- id-sports.mudept@gmail.com
वेबसाईट-www.mu.ac.in/sports

मुंबई विद्यापीठ

विद्यापीठ क्रीडा संकुल
मरीन लाईन्स, मुंबई - ४०० ०२०.
दूरध्वनी : २२८१ ७६९८/२२८२ ६०२७
क्र. क्रीडा/ २० /२०२२
दि. २३/९/२०२२
**तात्काळ/अती महत्त्वाचे**

प्रति,

प्राचार्य / संचालक / विभाग प्रमुख,
मुंबई विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व संस्था.

विषय :- जिमखाना शुल्क/क्रीडा निधी जमाखर्च/उपयोगिता प्रमाणपत्र व कार्याचा वार्षीक अहवाल सादर करणेबाबत.

महोदय / महोदया ,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क.क्रीडा समिती/७२ दि.२० नोव्हेंबर, २०१८ नुसार जिमखाना शुल्क रूपये ४००/- च्या १५% क्रीडा निधी रूपये ६०/- प्रति विद्यार्थी विद्यापीठाकडे जमा करणे व सदर परिपत्रकाच्या शिफारसीनुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे. (सदरचे परिपत्रक सोबत जोडले आहे) तसेच वार्षिक क्रीडा अंशदान थकीत असल्यास **दि.३१.१०.२०२२** पुर्वी वित्त व लेखा अधिकारी, मुंबई विद्यापीठ (Finance & Accounts Officer, University of Mumbai) यांच्या नावे धनाकर्षाद्वारे (By Demand Draft) संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, मुंबई विद्यापीठ क्रीडा संकुल, मरीन लाईन्स, मुंबई- ४०० ०२० येथे जमा करण्यात यावे ही विनंती.

***त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून मुंबई विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा चार विभागात सुरू झाल्यामुळे सन २०२१-२२ पासून प्रवेश शुल्क (Consolidated Entry Fee) स्विकारण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.***

आपणांस विनंती करण्यात येते की, सन २०२१-२२ मध्ये आपल्या महाविद्यालयाने जमा केलेला जिमखाना शुल्क (Gymkhana Fees) निधीचा जमाखर्च/उपयोगिता प्रमाणपत्र व कार्याचा वार्षिक अहवाल (Income & Expenditure / Utilization Certificate & Annual Report) विद्यापीठाच्या sports.mudept@gmail.com या ई-मेल वर दि.३१ ऑक्टोबर, २०२२ पुर्वी सादर करण्यात यावा ही विनंती.

धन्यवाद !

संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण

# मुंबई विद्यापीठ

क. क्रीडा /७२/ २०१८

परिपत्रक

ज्याअर्थी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १८ फेब्रुवारी, २०१४ रोजी झालेल्या बैठकीत बाब क्र.२५ नुसार उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी क्र. संकीर्ण /२०१३/प्र.क्र.२८९/विशि-३ दिनांक २५ जुलै, २०१३ रोजीचे राज्य क्रीडा व युवा धोरण २०१२ बाबतच्या कुलगुरूंच्या संयुक्त मंडळ उपसमितीच्या शिफारशींची अंमलबजावणी विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर करणेबाबतचा शासन निर्णय स्विकारण्यात आला.

तसेच ज्याअर्थी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २८ एप्रिल, २०१४ रोजी झालेल्या बैठकीत बाब क्र.४ मधील बाब क्र.७.१ नुसार सर्व विद्याशाखेतील महाविद्यालये/संस्था यांचेकरीता जिमखाना शुल्क/क्रीडा निधी ठरविण्याबाबतची विद्वत परिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.

तसेच ज्याअर्थी विद्वत परिषदेच्या दिनांक ४ मार्च, २०१४ रोजी झालेल्या बैठकीत बाब क्र.४.२७ अन्वये कला/वाणिज्य/विज्ञान या विद्याशाखांसाठी शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमाचा ऐच्छिक विषय म्हणून मुलभूत अभ्यासक्रमात ( Foundation Course) अंतर्भाव करण्यासाठी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेने दिनांक ४ एप्रिल, २०१४ रोजी झालेल्या बैठकीत बाब क्र.८ अन्वये मान्यता दिली.

तसेच ज्याअर्थी दिनांक ६ मार्च, २०१४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत बाब क्र. २ अन्वये तसेच ज्याअर्थी दिनांक १० सप्टेंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत बाब क्र.७ अन्वये विद्यापीठाच्या क्रीडा समितीच्या दिनांक १७ जानेवारी, २०१४ रोजी झालेल्या बैठकीत बाब क्र.३ नुसार केलेल्या शिफारसीनुसार महाविद्यालयीन युवा-युवतींसाठी राज्य क्रीडा व युवा धोरण - २०१२ तसेच शारिरीक शिक्षणाचा मुलभूत अभ्यासक्रम राबविण्यासाठी शारिरीक शिक्षण क्रीडा संचालकांची पदे भरण्यात यावी या शिफारशीस मान्यता देण्यात आली.

तसेच त्याअर्थी सर्व संलग्नित महाविद्यालयांचे / संस्थांचे प्राचार्य/ संचालक यांना कळविण्यात येते की, शैक्षणीक वर्ष २०१८- १९ पासून मुंबई विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर राज्य क्रीडा व युवा धोरण - २०१२ ची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

--- २

१. सर्व विद्याशाखेतील संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थानी जिमखाना शुल्क रू.४००/- आकारून त्यापैकी १५% रक्कम (रूपये ६०/- प्रति विद्यार्थी) क्रीडा निधी (Annual Sports Contribution) म्हणून विद्यापीठात जमा करण्यात यावी.

२. उर्वरीत जिमखाना निधीतून महाविद्यालये / संस्थानी शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक यांचा अंशकालीन / तासीका तत्वावर/पुर्णवेळ नियुक्त्या, आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा सहभाग, क्रीडा सोयी-सुविधांची निर्मीती, क्रीडा प्रशिक्षण/व्यवस्थापनाची तरतूद यासाठी खर्च करण्यात यावा.

३. प्रत्येक महाविद्यालय/संस्थेस सदर निधीचा जमाखर्च अहवाल, कार्याचा अहवाल तसेच उपयोगिता प्रमाणपत्र प्रतिवर्षी (३१ मार्च पुर्वी) विद्यापीठाच्या क्रीडा विभागास सादर करणे बंधनकारक राहील.

४. तसेच प्रचलीत शासन निर्णयाप्रमाणे शारीरिक शिक्षण संचालक / क्रीडा मार्गदर्शक यांची नेमणूक करण्यात यावी.

तसेच सोबत संदर्भीय शासन निर्णयाची प्रत अवलोकनार्थ जोडण्यात येत आहे.

31.12.18

कुलसचिव (प्र)
मुंबई विद्यापीठ

मुंबई - ४०० ०३२
२० नोव्हेंबर, २०१८

प्रति,
सर्व संलग्नित महाविद्यालयांचे / संस्थांचे प्राचार्य / संचालक

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता रवाना :-

१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग.
२. समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना
३. वित्त व लेखा अधिकारी
४. उपकुलसचिव, घटक व महाविद्यालये व संस्था कक्ष
५. उपकुलसचिव, कार्यकारी प्राथिकरणे विभाग
६. उपकुलसचिव, विद्याविषयक व प्राधिकरणे विभाग
७. उपकुलसचिव, पदविपुर्व/पदव्युत्तर विभाग
८. उपकुलसचिव, संलग्नता विभाग
९. कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक
१०. प्र-कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक
११. कुलसचिवांचे स्वीय सहाय्यक
१२. परिक्षा विभागांचे स्वीय सहाय्यक